निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २५३ वा.
सोमवार :१७ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# स्वर्गीय वसंतराव नाईक यांचे कार्य राज्याला दिशादर्शक- मुख्यमंत्री फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले स्वर्गीय वसंतराव नाईक यांनी राज्याच्या दुष्काळमुक्तीसाठी केलेली जलसंधारणाची कामे तसेच अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्णतेसाठी राबविलेल्या उपक्रमांचा आजही राज्याला मोठा लाभ होत आहे. राज्याला दिशा देणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

**हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे अनावरण**

छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको येथे हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण, दुगधविकास, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, माजी आमदार हरिभाऊ राठोड, माजी महापौर नंदकुमार घोडेले, विकास जैन, माजी उपमहापौर प्रमोद राठोड, मनपा आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा राज्याच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. राजकारणात विविध पदावर काम करताना महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्याचे देखील काम केले. बंजारा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण केली. समाजाला शिक्षणाकडे वळविण्यासाठी अनेक शिक्षण संस्थांची निर्मिती केली असून समाजातल्या विविध परंपरा जोपासल्या पाहिजेत यासाठीही त्यांनी प्रयत्न केला, राजकीय सामाजिक जीवनामध्ये नगराध्यक्ष पदापासून आमदार, खासदार, मुख्यमंत्री अशा विविध पदांवर नाईक साहेबांनी काम केले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सर्वाधिक काळ राहिलेले मुख्यमंत्री म्हणून स्वर्गीय नाईक साहेबांच्या नावाची नोंद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील १९७२ च्या भीषण दुष्काळात राज्याला जलसंधारणातून दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय स्वर्गीय वसंतराव नाईक यांनी घेतला.महाराष्ट्र दुष्काळमुक्त करायचा असेल तर जलसंधारण हाच एकमेव मार्ग आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब साठवा, जमिनीतील पाणी वाढवा, वाहून जाणारी माती रोखा तरच शेतकरी बांधवांना दिलासा मिळेल, असा विचार त्यांनी रूजविला. स्वर्गीय वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात




व्यापक स्वरूपात जलसंधारणाची कामे सुरू करून जलक्रांतीची पायाभरणी केली.

महाराष्ट्र अन्नधान्यांच्या बाबतीत समृद्ध व स्वयंपूर्ण व्हावा, हा त्यांचा स्पष्ट हेतू होता. महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करून मोठे परिवर्तन घडवून आणले आणि ते पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरले. दुष्काळाचा सामना करताना इतिहासाचा मागोवा घेतल्यावर हे प्रकर्षाने जाणवले की, दुष्काळाशी लढण्याचा खरा मार्ग म्हणजे नाईक साहेबांनी दाखविलेला जलसंधारणाचा मार्ग. त्याच प्रेरणेने पुढे जलयुक्त शिवार ही राज्यव्यापी योजना तयार करण्यात आली. या योजनेद्वारे महाराष्ट्रभर जलसंधारणाची मोठ्या प्रमाणावर कामे झाली. योजना तयार करत असताना अनेक व्यक्ती प्रेरणास्थान म्हणून आमच्यासमोर होत्या; परंतु या संपूर्ण उपक्रमामागील मूळ प्रेरणास्थान म्हणजे वसंतराव नाईक साहेबच, हे आपण त्या काळातही स्पष्टपणे नमूद केल्याचा उल्लेखही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

स्वर्गीय वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात कृषी व जलसंधारणाबरोबरच बंजारा समाजासाठीही मोठ्या प्रमाणात जागृती व विकासाची चळवळ उभी केली. तांड्यावर राहणारा, परंपरेने श्रमप्रधान पण विकासापासून दूर राहिलेला हा समाज एकेकाळी मार्गनिर्मिती, बावड्या बांधकामे आणि पायाभूत कामांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारा, समृद्ध इतिहास असलेला समाज आहे. पोहरादेवी येथे सेवालाल महाराजांनी बंजारा समाजासाठी निर्माण केलेली ‘काशी’ अधिक भव्य, आधुनिक आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारी व्हावी, यासाठी सरकारने ७०० कोटी रुपयांचा समग्र विकास आराखडा राबविला. त्यामुळे पोहरादेवीचा संपूर्ण कायापालट झाला असून आज ते राज्यातील महत्त्वाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक केंद्र बनले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी प्रथमच बंजारा काशी पोहरादेवीला भेट देत म्युझियमचे उद्घाटन केले. याशिवाय म्युझियममध्ये प्रवेश करताना पहिला पुतळा स्वर्गीय वसंतराव नाईक साहेबांचा स्थापित करण्यात आला आहे.समाज उन्नती, जागृती आणि परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या नाईक साहेबांच्या कार्याचा हा सन्मान असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून आज स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण होत आहे, हा दिवस खऱ्या अर्थाने बंजारा समाजासह आपल्या सर्वांसाठी दिवाळीप्रमाणेच आहे.

महानगर वेगाने वाढत असून महानगर सुंदर झाले पाहीजे, कुंभमेळयासाठी येणारे भाविक छत्रपती संभाजीनगर येथे येतील, त्यादृष्टीने शहराच्या रस्ते तसेच सर्वांगिण विकासासाठी निधीची तरतूद गरजेची असल्याचे ते म्हणाले. स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा पुतळा आपल्या सर्वांना प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले.

महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## शुभमन गिल दुसरी कसोटी खेळणार का?



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिली कसोटी तिसऱ्याच दिवशी संपली. भारताचा या कसोटीत ३० धावांनी पराभव झाला. भारताचा संघ १२४ धावांचं आव्हान गाठू शकला नाही. या मॅचनंतर प्रशिक्षक गौतम गंभीरनं कॅप्टन शुभमन गिलच्या दुखापतीवर भाष्य केलं आहे. या कसोटीत भारताला शुभमन गिलची अनुपस्थिती जाणवली.

शुभमन गिल पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी रिटायर्ड हर्ट होऊन मैदानाबाहेर गेला होता.त्यानंतर तो मैदानावर येऊ शकला नाही. गिलच्या मानेमध्ये वेदना होत असल्यानं त्याला रुग्णालयात जावं लागलं. याचा फटका भारतीय संघाला बसला. भारताला १२४ धावांचं आव्हान पार करता आलं नाही. भारताचा ३० धावांनी पराभव झाला आहे. मॅचनंतर प्रशिक्षक गौतम गंभीरनं पत्रकार परिषदेला संबोधित केलं. यामध्ये त्यानं गिलच्या दुखापतीबाबत माहिती दिली.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरी कसोटी २२ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहे. दुसरी कसोटी गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. गौतम गंभीरनं म्हटलं की दुसऱ्या कसोटीसाठी शुभमन गिल उपलब्ध असेल की नाही याबाबत स्थिती स्पष्ट नाही. त्याचा फिटनेस पाहून आम्ही यावर अंतिम निर्णय घेऊ.

गौतम गंभीर म्हणाला की शुभमन गिल सध्या बीसीसीआयच्या वैद्यकीय टीमच्या देखरेखीखाली आहे. शुभमन गिलच्या फिटनेसचा अभ्यास करत आहोत. काय होतंय पाहुया असं गौतम गंभीर म्हणाला. फिजिओ आज रात्री शुभमन गिलच्या दुखापतीबाबत निर्णय घेतील, त्याच्या आधारावर आमचं पुढचं पाऊल असेल, असं गंभीर म्हणाला.

ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीचा बचाव

गौतम गंभीरनं ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीचा बचाव केला.भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिल्या कसोटीत ज्या प्रकारचं पिच पाहायला मिळालं त्याच्यावर टीका होत आहे. मात्र, प्रशिक्षक गंभीर यानं खेळपट्टीचा बचाव केला, इथं फलंदाजांच्या संयमाची चाचणी होती. फलंदाजांना इथं सावधपणे खेळण्याची गरज होती. वेळ घेत फलंदाजी करायला हवी होती, आक्रमक फलंदाजी करण्याची गरज नव्हती, असं गंभीर म्हणाला. गंभीरनं वॉशिंग्टन सुंदर आणि टेम्बा बावुमाचं उदाहरण दिलं.

आम्ही जशी खेळपट्टी मागितली होती, त्याच प्रकारची ही खेळपट्टी होती. यामध्ये काही कमी नव्हतं, पूर्णपणे खेळ्यासाठी योग्य खेळपट्टी होती. तुम्ही जर याला फिरकी खेळपट्टी म्हणाल मात्र वेगवान गोलंदाजांनी सर्वाधिक विकेट घेतल्यात, असं गंभीर म्हणाला.

## लालू यादवांच्या कुटुंबातील वाद चिघळला; तेज प्रतापांचा रुद्रावतार

आत्ताच एक्सप्रेस

बिहार/ वृत्तसेवा/ विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर दुसऱ्याच दिवशी लालू यादव यांच्या कुटुंबातील दुफळी समोर आली आहे. त्यांची मुलगी रोहिणी आचार्य यांनी राजकारणातून राजीनामा देण्याची घोषणाच केली नाही तर कुटुंबापासून वेगळे होण्याची घोषणाही केली. आता त्यांचे भाऊ तेज प्रताप यादव त्यांच्या समर्थनार्थ समोर आले आहेत. त्यांनी रोहिणी आचार्य यांच्या कथित विरोधकांना इशारा दिला आहे.

कालच्या घटनेने माझे हृदय अगदी हादरून गेलं आहे

तेज प्रताप यादव यांनी लिहिले, कालच्या घटनेने माझे हृदय अगदी हादरून गेले आहे. माझ्यासोबत जे घडले ते मी सहन केले, पण माझ्या बहिणीचा अपमान कोणत्याही परिस्थितीत असह्य आहे. ऐका, जयचंद, जर तुम्ही कुटुंबावर हल्ला केला तर बिहारचे लोक तुम्हाला कधीही माफ करणार नाहीत. माझी बहीण रोहिणीला चप्पल मारल्याची बातमी ऐकल्यापासून माझ्या हृदयातील जखम आगीत बदलली आहे. जेव्हा सार्वजनिक भावना दुखावल्या जातात तेव्हा माझ्या बुद्धीतील धूळ उडून जाते. या काही चेहऱ्यांनी तेजस्वीच्या बुद्धीवरही ढग पसरवले आहेत. या अन्यायाचे परिणाम विनाशकारी असतील. काळाचा हिशोब खूप कठोर आहे.

**तुमच्याकडून फक्त एक इशारा द्या**

तेज प्रताप यादव म्हणाले, मी आरजेडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माझे वडील, माझे राजकीय गुरू लालू प्रसाद यादव जी यांना विनंती करतो की, बाबा, मला एक संकेत द्या, तुमच्याकडून फक्त एक इशारा, आणि बिहारचे लोक स्वतःच या जयचंदांना पुरतील. ही लढाई कोणत्याही पक्षासाठी नाही, ती कुटुंबाच्या सन्मानासाठी, मुलीच्या




प्रतिष्ठेसाठी आणि बिहारच्या स्वाभिमानासाठी आहे.

तेजस्वी यादव आणि रोहिणी आचार्य यांच्यात जोरदार वाद

दरम्यान, बिहार निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर लालू कुटुंबातील तणाव स्पष्ट झाला आहे. कुटुंबातील आरोप-प्रत्यारोपांचा खेळ इतका वाढला की तेजस्वी यादव आणि त्यांची बहीण रोहिणी आचार्य यांच्यात जोरदार वाद सुरू झाला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कौटुंबिक वादाच्या वेळी तेजस्वी यांनी रोहिणी यांना टोमणे मारले, तू खूप आनंदी असायला हवीस, तुला जे हवे होते तेच झाले. रोहिणी संतापली आणि म्हणाली, ज्या पद्धतीने तू कुटुंबातील मुलीचा अपमान करत आहेस, त्यामुळे तुला माझा शाप मिळेल.

पराभवासाठी रोहिणींना जबाबदार धरले

सूत्रांनुसार, घरी झालेल्या जोरदार वादाच्या वेळी तेजस्वी यादव यांनी बिहार निवडणुकीतील पराभवासाठी रोहिणींना जबाबदार धरले. रोहिणी सिंगापूरहून पाटण्याला आल्या होत्या आणि प्रचारात सहभागी होऊ इच्छित होत्या, परंतु त्यांना मर्यादित ठिकाणी पाठवण्यात आले. सारणमध्ये, त्यांना फक्त एका दिवसासाठी आमंत्रित करण्यात आले होते, तेही अखिलेश यादव यांच्या रॅलीदरम्यान. तरीही, पराभवासाठी तेजस्वी दोषी ठरवत असल्याने नाराज होत्या.

रोहिणी यांचा पलटवार

वाद इतका वाढला की तेजस्वीने रोहिणी यांना उपहासात्मक टिप्पणी केली, तू खूप आनंदी असायला हवीस, तुला जे हवे होते तेच घडले. रोहिणीने तीव्र उत्तर दिले, तू ज्या पद्धतीने वागते आहेस, त्यामुळे माझे मन तुला शाप देत आहे. थांब आणि बघ, तुला माझ्या शापाचा फटका बसेल.

वाद टोकाला पोहोचल्यानंतर, रोहिणी आचार्य शनिवारी रात्री उशिरा रडत रडत राबडीच्या निवासस्थानातून निघून गेल्या. पाटणा विमानतळावर पत्रकारांना सांगितले, माझे कुटुंब नाही. त्यांनीच मला कुटुंबातून बाहेर काढले. जग प्रश्न विचारत आहे की पक्ष या अवस्थेत का पडला आहे, परंतु ते जबाबदारी घेऊ इच्छित नाहीत.

वादादरम्यान संपूर्ण कुटुंब उपस्थित

जेव्हा तेजस्वी आणि रोहिणी यांच्यात काल जोरदार वाद झाला तेव्हा लालू प्रसाद, राबडी देवी आणि राहेलसह संपूर्ण कुटुंब घरात उपस्थित होते. वातावरण इतके तणावपूर्ण झाले की जेव्हा रोहिणी घराबाहेर पडू लागल्या तेव्हा लालू आणि राबडी दोघेही भावनिक झाले. या वादात कुटुंबातील सर्व बहिणी रोहिणीच्या पाठीशी उभ्या राहिल्या आणि तेजस्वीला विरोध केला.

## मुंबई महानगरपालिकेत काँग्रेसचा स्वबळावर लढण्याचा निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेसकडून स्वबळाचाना नारा देण्यात आल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे कोणती भूमिका घेणार चर्चा रंगली होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी अवघ्या तीन शब्दांमध्ये काँग्रेसचा निर्णयावर प्रतिक्रिया दिली. आमचा निर्णय घेण्यासाठी आम्ही समर्थ आहोत, तर त्यांचा निर्णय ते घेण्यास समर्थ असल्याचे ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, त्यांचा पक्ष स्वतंत्र आहे. माझा पक्ष माझ्यासाठी स्वतंत्र निर्णय घेण्यासाठी समर्थ आहे. उद्धव ठाकरे यांनी फार गंभीरतेने काँग्रेसच्या स्वबळाचा निर्णय घेतला नाही. दरम्यान उद्धव ठाकरे यांनी बिहार निवडणुकीच्या निकालावरही भाष्य केले. मत देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या प्रतिक्रियेवर खोचक टोला लगावला. ठाकरे म्हणाले की तेजस्वींच्या सभांना मोठा प्रतिसाद लाभत होता. मग तो काय -ख च्या माध्यमातून होता का? अशी विचारणा उद्धव ठाकरे यांनी केली. ज्यांच्या सभांना गर्दी होत नाही ते कसे जिंकले? बिहारचे गणित अनाकलनीय असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. ते पुढे म्हणाले की या निवडणुकीमध्ये महिलांच्या खात्यामध्ये दहा हजार रुपयांचा महत्त्वाचा फॅक्टर ठरला असावा. मुख्यमंत्र्याचा चेहरा निवडण्यासाठी एक महिन्यांचा कालावधी लावण्यात आला होता. त्यामुळे बिहारमध्ये किती वेळ लावणार हे पहाव लागेल, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

वाढीव मतदारांवरूनही उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. ते म्हणाले की, की वाढणारे मतदार कुठून



येतात हे पहावं लागेल.

आमचा निवडणुकींना विरोध नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितलंय प्रादेशिक पक्षांच्या मोदींच्या भूमिकेवरूनही उद्धव ठाकरे यांनी टीका केली. प्रादेशिक पक्षांना संपवण्याचे वक्तव्य मोदी यांचं होतं, असंही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

दरम्यान, मुंबईमध्ये उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याची चर्चा रंगली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये त्यांची वाढलेली जवळीक पाहता दोन्ही बंधू एकत्रितपणे मुंबई महानगरपालिका तसेच ठाणे, कल्याण डोंबिवली मनपा निवडणुका एकत्र लढतील असे चित्र आहे.

त्यामुळे काँग्रेसकडून मनसेला थेट विरोध सुरू आहे. त्यामुळे काँग्रेसच्या झालेल्या बैठकीमध्ये स्वबळाचा नारा देण्यात आला. दुसरीकडे स्थानिक पातळीवर निवडणुका लढवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोकळीक दिली आहे. त्यामुळे मुंबईमध्ये शरद पवारांची राष्ट्रवादी ठाकरेंना साथ देणार का? याची उत्सुकता आहे.

## आता आणखी एका देशाची तरुणाई सरकारविरोधात रस्त्यावर

**आत्ताच एक्सप्रेस**

**दिल्ली/प्रतिनिधी/** मेक्सिकोमध्ये वाढत्या गुन्हेगारी, भ्रष्टाचार, हिंसाचारासाठी शिक्षा न होणे, सार्वजनिक हत्याकांड आणि सुरक्षेचा अभाव याविरोधात शनिवारी हजारो त्र्क्षापन रस्त्यावर उतरली. महापौरांच्या सार्वजनिक हत्येमुळे हा राग आणखी भडकला. १ नोव्हेंबर रोजी, पश्चिम मेक्सिकन राज्यातील मिचोआकान येथे एका कार्यक्रमादरम्यान उरुपानचे महापौर कार्लोस मांझो यांची गोळीबारात हत्या करण्यात आली. संतप्त तरुणाईने राष्ट्राध्यक्षांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या राष्ट्रीय राजवाड्याच्या सुरक्षा भिंती तोडल्या. निदर्शकांनी दगड, हातोडा, फटाके, काठ्या आणि साखळ्यांनी पोलिसांवर हल्ला केला.

पुढील वृत्त पान ४ वर..

## शिक्षकाचा प्रामाणिकपणा, रस्त्यावर सापडलेला मोबाईल केला परत!

**शिवाजी चव्हाण यांच सर्वत्र केलं जातं आहे कौतुक**

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/प्रतिनिधी**/हल्लीच्या काळात कुणी रस्त्यावर सापडलेला रुपया देखील परत करत नसताना शहर शिक्षक शिवाजी चव्हाण यांनी रस्त्यावर सापडलेला २५ हजारांचा मोबाईल परत केला आहे.तालुक्यातील होट्टल येथील रहिवासी असलेले बबलू माधव वंकलवार हे आपलं ऑफिस चे काम संपवून सायंकाळच्या सुमारास रस्त्याने गाडीवर जात असताना खिशातून त्यांचा मोबाईल




डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रस्त्यावर पडला आणि त्यांची गाडी वेगाने पुढे गेली. शहरातील शिवनेरी येथील रहिवाशी असलेले शांती वर्धक हायस्कुल कुन्मारपल्ली येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले शिवाजी चव्हाण मानूरकर हे रस्त्याने येत असताना त्यांना रस्त्यावर एक मोबाईल पडलेला दिसला.शिवाजी चव्हाण यांनी मोबाईल खिशात ठेवला व थोडा वेळी कोणी येईल का याची वाट पाहिली पण त्या ठिकाणी कोणीही आले नाही. थोडया वेळाने ते घरी आले तेव्हा तो मोबाईल बंद होता.त्यांनी हा सर्व प्रसंग त्यांचे मेहुणे तथा पत्रकार विशाल पवार यांना सांगितले असता त्यांनी लगेच फोन चार्जिंग लावून मोबाईल चालू केला असता वंकलवार यांच्या छोट्या भावाचा फोन आला विशाल पवार त्यांनी मोबाईल बाबत माहिती दिली. सदरील मोबाईल हे बबलू वंकलवार यांच्या मालकीचा असल्याची खात्री पटल्यावर सावित्रीबाई फुले प्रा. शाळेचे मुख्याध्यापक किशन पाटील यांच्या हस्ते मोबाईल परत करण्यात आला. २५ हजारांचा मोबाईल परत मिळाल्याने वंकलवार यांनी शिक्षक शिवाजी चव्हाण यांचे आभार मानले. शिवाजी चव्हाण यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# जागतिक बँकेच्या निधीचा वापर - निवडणूकपूर्व राजकीय प्रभाव?

पवन वर्मा यांनी असा गंभीर आरोप केला आहे की महिलांच्या खात्यात जमा करण्यात आलेले १०,००० रुपये जागतिक बँकेच्या निधीतून वळवले गेले, आणि हे पैसे निवडणूक आचारसंहिता लागू होण्याच्या काही तास आधीच देण्यात आले.

हा निधी मूळतः दुसऱ्या विकास प्रकल्पासाठी देण्यात आला होता.परंतु निवडणुकीच्या काही तास आधी हा निधी थेट महिला मतदारांच्या खात्यात वळवला गेला.या निवडणूकपूर्व हस्तांतरणाचा परिणाम थेट मतदानावर पडल्याची राजकीय वर्तुळात चर्चा होती.ते म्हणतात की विश्वसनीय स्रोतांनी त्यांना माहिती दिली असून, तथ्य सिद्ध झाल्यास ही संपूर्ण निवडणूक नैतिकदृष्ट्या प्रश्नांकित ठरेल. वाढतं कर्ज आणि रिकामी तिजोरी - या कारणामुळे निधी वळवला?त्यांच्या मते: बिहारचे कर्ज ४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे.राज्याला रोज प्रचंड व्याज द्यावे लागत आहे.तिजोरी जवळपास रिकामी असल्याने निवडणुकीपूर्वी एवढी मोठी रक्कम देण्यासाठी सरकारने बाह्य निधीचा आधार घेतला.याशिवाय त्यांनी असा आरोप केला की जर एनडीए पुन्हा सत्तेत आले नाही, तर पुढील निधी थांबेल असा संदेश सरकारने महिलांमध्ये पसरवला, ज्याचा भावनिक आणि मानसिक परिणाम मतदानावर झाला.महिला मतदार - बिहारच्या राजकारणातील सर्वात मोठा निर्णायक वर्ग बिहारमधील गेल्या काही निवडणुकांमध्ये महिलांचे मतदान पुरुषांपेक्षा अधिक झाले आहे. त्यामुळे अनेक सरकारी योजना महिलांवर केंद्रित होत्या -उज्ज्वला,आरोग्य योजना, रेशन कार्ड सुधारणा,थेट बँक हस्तांतरण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी आणि दैनंदिन जीवन सुलभ करण्यासाठी या योजना राबवण्यात आल्या.वर्मांच्या मते, ०,००० रुपयांच्या योजनेचा थेट राजकीय फायदा एनडीएला झाला, कारण महिलांनी मोठ्या प्रमाणावर मतदानात भाग घेतला.

पवन वर्मा यांनी पंतप्रधान मोदींनी वारंवार मोफतच्या राजकारणावर केलेली टीका आठवून दिली.ते म्हणाले,केंद्र सरकार मुफ्त की रेवडियाँ म्हणत जे राजकारण हिणवत होते, त्याच पद्धतीचा वापर बिहार निवडणुकीत महिलांच्या खात्यात पैसे पाठवून केला गेला.हा विरोधाभास जनतेमध्येही चर्चेचा विषय बनला आणि त्यामुळे निवडणूक परिणामांवर प्रभाव पडला, असे वर्मांचे मत आहे.

दारूबंदीचा मुद्दा - जन सूरजविरुद्ध वापरलेला कथित प्रचार?काही जणांचा आरोप आहे की प्रशांत किशोर यांनी सत्तेत आल्यास दारूबंदीत सुधारणा करणार असल्याने महिला मतदार नाराज झाले.पण पवन वर्मा यांनी हा दावा फेटाळला. त्यांचे म्हणणे:

राज्यात सध्या दारू सहज उपलब्ध आहे. दारूबंदी असूनही कुटुंबांमध्ये तणाव वाढला आहे.त्यामुळे महिलांनी जन सूरजविरुद्ध मतदान केल्याचा दावा वास्तविकतेपासून दूर आहे. जन सूरजचा पराभव - कारणे आणि निवडणूक गणित जन सूरज पक्षाला शेकडो मतदारसंघांत खूप चांगला मतांचा वाटा मिळाला, पण एकही जागा जिंकता आली नाही.मतांचा टक्का मिळवणे आणि २.जागा जिंकणे या दोन गोष्टी बिहारच्या राजकीय समीकरणात पूर्णपणे वेगळ्या आहेत.ते म्हणतात की - एनडीएच्या महिलांवर केंद्रित योजनांचा खालेवर प्रभाव होता. १०,००० रुपयांच्या हस्तांतरणाने निवडणूक प्रचाराच्या अर्थशास्त्राला नवे परिमाण दिले. पारंपारिक जातीय-सामाजिक समीकरणे अजूनही प्रभावी आहेत. जन सूरज हा नवा पक्ष असल्याने जमिनीवरची संरचना अजून मजबूत नव्हती.

# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

आज १७ नोव्हेंबर, आजच्याच दिवशी म्हणजे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसांना पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची १३ वी पुण्यतिथी. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्राभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले.

शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# पुण्याचा नवले ब्रिज किती निष्पापांचे बळी घेणार? - ड. शंकर चव्हाण

आत्ताच एक्सप्रेस

पुणे/प्रतिनिधी/पुण्यातील नवले ब्रिज परिसर पुन्हा एकदा गंभीर रस्ते सुरक्षेच्या समस्यांकडे लक्ष वेधत आहे. गेल्या काही वर्षांपासून या पुलाजवळील रस्ते अपघातांचे केंद्र बनले आहेत. वाहतुकीची कोंडी, बेफिकीर वाहनचालक, खड्डे, चुकीचे रस्ते नियोजन आणि प्रशासनाची उदासीनता या सर्व घटकांनी येथे होणाऱ्या अपघातांची संख्या वाढवली आहे. अनेक पुणेकरांनी या भागाला नवले ब्रिज स्मशानभूमी असे नाव दिले आहे, कारण इथे दर काही दिवसांनी अपघात घडतात आणि निष्पाप नागरिकांचा जीव गेला जातो.मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता ड. शंकर चव्हाण यांनी यावर महाराष्ट्र शासन आणि पुणे प्रशासनाला थेट सवाल केला आहे, की नवले ब्रिज आणखी किती निष्पापांचे बळी घेणार? किती जणांचा जीव जाईल तेव्हा प्रशासन जागे होईल? या प्रश्नाने पुणेकरांच्या मनातील संताप, असुरक्षितता आणि चिंता स्पष्टपणे व्यक्त केली आहे.

पुणे शहराची लोकसंख्या सतत वाढत आहे, परंतु रस्त्यांची क्षमता, वाहतुकीची व्यवस्था आणि पायाभूत सुविधा त्या वाढीला तितकीशी प्रतिसाद देत नाहीत. नवले ब्रिज परिसरातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहेत. अनेक कुटुंबांसाठी हा पुल हा त्यांच्या प्रियजनांच्या सुरक्षिततेचा प्रश्न बनला आहे. नागरिकांनी प्रशासनास वारंवार निवेदनं दिली, मागण्या केल्या आणि स्थानिक प्रतिनिधींशी संवाद साधला, तरी प्रत्यक्षात रस्त्यांची स्थिती सुधारत नाही.

चव्हाण यांनी प्रशासनाच्या उदासीनतेवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, सध्या महाराष्ट्रातील आणि पुण्यातील राजकीय वातावरण निवडणुकांकडे केंद्रित आहे, ज्यामुळे सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेकडे, पायाभूत सुविधा आणि रस्ते व्यवस्थेकडे दुर्लक्ष होत आहे. वाहतूक पोलीस आणि ठढज विभागांवर त्यांनी टिका केली की, गरिबांकडून चालान काढण्यात विभाग तत्पर असतो, पण जीव वाचवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात ते उदासीन आहेत.

नवले ब्रिज परिसरात अनेक धोके आहेत-मोठमोठे खड्डे, असमान रस्ते, पावसाळ्यात पाण्याने भरलेले खड्डे, चुकीच्या ठिकाणी बसलेल्या बस-टेम्पो, चौकात सिग्नल नसणे किंवा सिग्नल कार्यरत न असणे. यामुळे वाहनचालक गोंधळले जातात आणि अपघात होण्याची शक्यता वाढते. आवश्यक ठिकाणी गतिरोधक नसणे, चेतावणी फलकांचा अभाव, रस्त्यांचे योग्य रीतीने देखभाल न होणे या सर्वामुळे अपघातांचा धोका दुपटीने वाढतो.पुण्यातील प्रदूषणाचा एक महत्त्वाचा घटक ही अपूर्ण रस्त्ये आणि सुरू असलेली कामे आहेत. नवले ब्रिज परिसरात रस्ते खोदकाम, सिमेंट रस्त्यांची कामे, ड्रेनेज लाईन आणि केबल कामे सतत सुरू असतात. काही ठिकाणी आठवडे-आठवडे काम पूर्ण होत नाही. त्यामुळे धूळ आणि झच् पातळी वाढते, ज्यामुळे नागरिकांना श्वसनाचे आजार, ॲलर्जी, डोळ्यांचे आजार वाढतात.

चव्हाण यांनी प्रशासनाला स्पष्ट सांगितले आहे की, तात्काळ उपाययोजना केल्या नाहीत तर अपघात आणि निष्पापांचा जीव जात राहील. त्यांनी ट्रॅफिक पोलिसांची नेमणूक, योग्य सिग्नलिंग प्रणाली, चेतावणी फलक, रस्त्यांची मजबुतीकरण मोहीम, खड्डेमुक्ती आणि वैज्ञानिक वाहतूक नियोजन तात्काळ करण्याची मागणी केली आहे. नवले ब्रिज हा फक्त एक पूल नाही, तर पुण्याच्या पश्चिम भागातील महत्त्वाचा वाहतुकीचा मार्ग आहे. येथे दररोज लाखो वाहनांची वाहतूक होते, त्यामुळे हा मार्ग सुरक्षित करणे हे जनतेचे हक्क आणि प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे.जर प्रशासनाने या भागात सुधारणा केली नाही, तर भविष्यात नवले ब्रिजवर अपघातांचे प्रमाण अजून वाढेल आणि निष्पाप नागरिकांचे जीव जाण्याची शक्यता कायम राहील. पुणेकरांचा वेळ, जीवन आणि सुरक्षितता वाचवणे हे शासनाचे कर्तव्य आहे, आणि हे कर्तव्य गांभीर्याने घेतले नाही, तर या पुलाचे भवितव्य आणखी चिंताजनक ठरेल.

# वैद्यनाथ भक्ती मंडळाची आजची स्वच्छता मोहीम सेवा कार्य



**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी/प्रतिनिधी**/वैद्यनाथ भक्ती मंडळाची आजची स्वच्छता मोहीम सेवा कार्य म्हणून स्वाती नगर येथील बजरंग बली मंदिरात आयोजित करण्यात आली. या मोहिमेत मंदिराच्या परिसरासह आजूबाजूच्या रस्त्यांचे आणि परिसरातील कचरा व घाण साफ करण्याचे कार्य केले गेले. सेवा कार्यासाठी सदैव तत्पर असलेल्या मंडळाच्या बांधवांनी आपली पूर्ण मेहनत, समय आणि उत्साह दाखवून ही मोहीम यशस्वी केली.

मंदिर परिसरात फेकलेल्या कचऱ्याचे व्यवस्थीत संकलन करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणी करण्यात आली. तसेच, उपस्थितांनी परिसरात प्लास्टिक, कागद आणि इतर उपयुक्त व अव्यवहार्य वस्तू वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये वर्गीकरण करून स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान दिले.मंडळाच्या सदस्यांनी या मोहिमेद्वारे स्थानिक नागरिकांमध्ये स्वच्छता आणि समाजसेवेची जाणीव वाढवण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या प्रत्येकाने उत्साहपूर्वक सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी आणि मंदिर परिसराच्या सौंदर्यवर्धनाचे उदाहरण सादर केले. यामुळे स्थानिक लोकांमध्ये स्वच्छता आणि संस्कृतीच्या जपणुकीसंबंधी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

# विद्यार्थी : नवयुगाच्या परिवर्तनाचे वाहक

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा केवळ एका दिवसाचे स्मरण नाही; तो समाजाच्या उत्क्रांतीतील विद्यार्थी या शक्तिशाली घटकाची ओळख करून देणारा ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि तात्त्विक प्रक्रियेचा जीवंत पुरावा आहे. १७ नोव्हेंबर हा दिवस जगभरात अशा विद्यार्थ्यांच्या स्मरणार्थ पाळला जातो, ज्यांनी शिक्षण, स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि ज्ञानस्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. विद्यार्थी हे समाजाचे प्रतिबिंब मानले जातात; समाजातील मूल्ये, संघर्ष, धारणा, आकांक्षा आणि भविष्यदृष्टी विद्यार्थीवर्गात प्रकर्षाने दिसून येतात. म्हणूनच या दिवसाचे महत्त्व केवळ शैक्षणिक घटकापुरते मर्यादित नसून, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ते मानवी सभ्यतेच्या विकासाचा मूलभूत आधार आहे.

जगातील विविध संस्कृती, जात-धर्म, भाषा, आर्थिक स्तर आणि राजकीय परिस्थिती यामुळे एक बहुविध विद्यार्थीसमूह निर्माण होतो. हा विद्यार्थीवर्ग ही केवळ शाळा-कॉलेजांतून शिक्षण घेणारी मंडळी नसून, समाजरचनेतील शिक्षित नागरिक होण्याची प्रक्रिया अंगीकारणारी व्यक्ती आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने विद्यार्थी म्हणजे समाजातील सामाजिक परिवर्तनाची प्रयोगशाळा होय. विद्यार्थीदशा ही मानवी जीवनातील सर्वात निर्मितीक्षम अवस्था आहे. मूल्यांची रुजवण, विचारांची परिपक्वता, सामाजिक न्यायाची भावना, समावेशकतेचा विकास आणि नागरी जबाबदारीची जाणीव यांची सुरुवात याच काळात दृढ केली जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा आधुनिक समाजाच्या चौकटीत विद्यार्थ्यांना असणाऱ्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे.या दिवसाचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १९३९ मध्ये नाझीवादाच्या विरोधात उभे राहिलेले चेकोस्लोव्हाकियातील विद्यार्थी हे स्वातंत्र्य आणि मानवाधिकारांसाठी लढणाऱ्या युवा पिढीचे प्रतीक बनले. त्यांच्या बलिदानाने जगभरात विद्यार्थ्यांचे अस्मितासंघर्ष, सामाजिक न्यायाच्या लढाया आणि बौद्धिक क्रांतीची सुरुवात केली. समाजशास्त्रानुसार विद्यार्थी आंदोलन ही सामाजिक बदलांची ऊर्जा असते. समाजातील अन्याय, दडपशाही, आर्थिक विषमता किंवा राजकीय अस्थैर्य यावर सर्वप्रथम प्रतिक्रिया विद्यार्थ्यांकडून येते. कारण विद्यार्थ्यांकडे विचारांची निर्भयता, प्रश्न विचारण्याची सवय आणि चुकीच्या व्यवस्थेविरोधात उभे राहण्याची मानसिकता असते. हीच वैशिष्ट्ये त्यांना सामाजिक प्रगतीचे वाहक बनवतात.

आजच्या काळातील विद्यार्थी हे जागतिकीकरणाच्या वेगवान प्रक्रियेत वाढलेले 'ग्लोबल सिटिझन्स' आहेत. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या विस्फोटाने त्यांच्यापर्यंत ज्ञानाचे असंख्य मार्ग खुले केले आहेत. सामाजिक माध्यमे, डिजिटल साधने, ऑनलाईन शिक्षण, आंतरराष्ट्रीय एक्स्चेंज प्रोग्रॅम्स, विविध देशांच्या शैक्षणिक संधी या सर्वामुळे विद्यार्थीवर्ग एक जागतिक समुदाय बनला आहे. तथापि, या जागतिकीकरणात विषमता, भेदभाव, ओळख संघर्ष आणि मानसिक दडपण या समस्या देखील वाढल्या आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आधुनिक शिक्षणव्यवस्थेत 'कौशल्याधारित स्पर्धा' वाढली असली तरी 'मानवी मूल्ये' आणि 'सामाजिक जबाबदारी' यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन अशा स्थितीत विद्यार्थ्यांना केवळ करिअर-केंद्रित नव्हे, तर मूल्य-आधारित आणि समाजोन्मुख दृष्टिकोन अंगीकारण्याचा संदेश देतो.

शिक्षणाचा खरा उद्देश मानवाला विचारक्षम बनवणे हा आहे. विद्यार्थी जेव्हा समाजातील प्रश्नांकडे चिकित्सक नजरेने पाहू लागतात, तेव्हा समाजातील बदल अपरिहार्य होत जातो. पर्यावरणीय समस्या, लैंगिक समानता, आर्थिक न्याय, भ्रष्टाचारविरोध, मानवाधिकार, ग्रामीण-शहरी विषमता यांसारख्या मुद्द्यांवर विद्यार्थी सक्रियतेने आवाज उठवत असतात. उदा. जागतिक तापमानवाढीविरोधातील युवा आंदोलन, भारतातील विद्यार्थ्यांचे सामाजिक न्यायासाठीचे संघर्ष, असमानतेविरोधातील लढाया ही सर्व विद्यार्थीचळवळी समाजाला नवी वाट दाखवतात. समाजशास्त्रात 'सामाजिक क्रिया' ही संकल्पना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत लागू पडते, कारण तेच सामाजिक कृतीचे प्रमुख घटक आणि सामाजिक क्रांतीचे जनक असतात.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे आदर्शवाद होय. समाजात अनेकवेळा भ्रष्टाचार, अन्याय, सत्तेचा दुरुपयोग, संसाधनांचे असमान वाटप किंवा जातीय भेदभाव दिसून येतो. परंतु विद्यार्थी हा वर्ग या गोष्टींना सहज स्वीकारत नाही. त्यांच्या विचारांमध्ये नैतिकता आणि न्यायाची जाणीव प्रबळ असते. त्यामुळे विद्यार्थी हे समाजघटकांवर 'नैतिक दबाव' निर्माण करण्याचे काम करतात. यामुळे सामाजिक मूल्यांचे संरक्षण आणि समाजाच्या नैतिक अध:पतनाविरोधात विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावतात.आजच्या काळात विद्यार्थ्यांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. मानसिक आरोग्याचा प्रश्न सर्वात गंभीर आहे. सततची स्पर्धा, कुटुंबीय अपेक्षा, समाजातील तुलना, करिअरचा दबाव, आर्थिक ताण आणि डिजिटल विचलन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणा वाढताना दिसतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आधुनिक समाजातील 'उत्पादकता-केंद्रित संस्कृती' विद्यार्थ्यांना यांत्रिक बनवत आहे. शिक्षणाचा आनंद, कल्पकता, संवाद, सांस्कृतिक सहभाग आणि भावनिक विकास यांना कमी महत्त्व दिले जात आहे. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याची, संतुलित जीवनशैली राखण्याची आणि स्वतःबद्दल संवेदनशील राहण्याची आठवण करून देतो.

दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे सामाजिक माध्यमांचा प्रभाव होय. सोशल मीडिया विद्यार्थ्यांना माहितीचा प्रचंड स्रोत देतो, पण तेवढ्याच प्रमाणात त्यांच्यात तुलना, अपप्रचार, ध्रुवीकरण आणि भ्रम निर्माण करतो. समाजशास्त्रीय भाषेत या प्रक्रियेला 'प्रतिकात्मक हाताळणी' किंवा 'माध्यम समाजीकरण' असे मानले जाते. विद्यार्थी यामुळे अनेकदा खोट्या ओळखी, खोट्या अपेक्षा आणि अवास्तव यशाच्या स्पर्धेत अडकतात. म्हणूनच समाजाने विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरतेचे खरे तत्त्वज्ञान शिकवणे आवश्यक आहे.याशिवाय ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांतील दरी आजही चिंताजनक आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचा अभाव, आर्थिक मर्यादा, तंत्रज्ञानाची कमतरता आणि सामाजिक रूढी यांचा सामना करावा लागतो. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांना बहुआयामी संधी उपलब्ध नसतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही दरी सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन अशा असमानतेकडे लक्ष वेधून शिक्षण सर्वसमावेशक, न्याय्य आणि लोकशाहीवादी करण्याचा संदेश देतो.

विद्यार्थ्यांचे समाजातील योगदान अपार आहे. ते केवळ भविष्यातील नागरिक नसून वर्तमानातील सक्रिय घटक आहेत. सामाजिक उपक्रम, स्वयंसेवा, डिजिटल अभियान, पर्यावरण संवर्धन, विज्ञान संशोधन, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा आणि साहित्यया सर्व क्षेत्रांत विद्यार्थी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. समाजशास्त्रातील 'युवक भांडवल' ही संकल्पना त्यांच्याशी अत्यंत निगडित आहे. ज्ञान, कौशल्य, ऊर्जा, सर्जनशीलता, नेतृत्वगुण आणि नवीन दृष्टी यामुळे विद्यार्थी समाजाच्या प्रत्येक घटकाचे पुनर्रचनाकार ठरतात.आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन आपल्याला शिकवतो की प्रत्येक विद्यार्थ्यात एक बदल घडविण्याची क्षमता दडलेली आहे. शिक्षण हा केवळ रोजगार मिळविण्याचा मार्ग नाही, तर समाजाला अधिक मानवी, समताधिष्ठित, शांतताप्रिय आणि न्याय्य बनविण्याचे साधन आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, कौशल्य, नवनिर्मितीशीलता आणि संवेदनशीलता यांमुळे समाज अधिक सक्षम आणि प्रगतिशील होतो. म्हणूनच शिक्षक, पालक, शासन आणि समाजाने विद्यार्थ्यांना प्रेरणादायी वातावरण, सुरक्षितता, संधी, समुपदेशन आणि मूल्याधारित शिक्षण देणे अत्यावश्यक आहे.शेवटी, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा केवळ औपचारिक दिन नसून, तो विद्यार्थ्यांच्या संघर्ष, त्यांच्या स्वप्नांतील विस्तार, सामाजिक परिवर्तनातील त्यांचे योगदान आणि मानवतेसाठी त्यांच्या भूमिकेचे अभिवादन आहे.

विद्यार्थी हे उद्याचे नाही तर आजचे शिल्पकार आहेत. त्यांच्या विचारांमध्ये एक समाज बदलण्याची क्षमता आहे, त्यांच्या स्वप्नांत एक जग घडविण्याची शक्ती आहे, आणि त्यांच्या कृतींत मानवतावादी भविष्यातील आशा दडलेली आहे. या दिवसाचे महत्त्व ओळखून आपण प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, समता, स्वातंत्र्य आणि संधी यांची हमी देणारे समाज निर्माण करण्याचा संकल्प केला, तरच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन साजरा करण्याचे खरे सार्थक होईल. विद्यार्थीवर्ग हा मानवतेचा दीपस्तंभ आहे-त्यांची उजळणी झाली, तर समाजाचा उद्याही निश्चितच अधिक उज्ज्वल होईल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

# स्वामी रामनंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ति संग्रामात अमुल्य योगदान- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** मराठवाडा मुक्ति संग्रामाच्या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ यांनी तरुणाईमध्ये देशभक्ती जागृत करून महिला व अनेक स्वातंत्र्यसैनिकांना सोबत घेऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त केले. हे योगदान अमुल्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. क्रांती चौक येथील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे अनावरण करून लोकार्पण केले. तसेच याच ठिकाणी ऑनलाईन पद्धतीने ऐतिहासिक कमल तलावाचेही लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह मराठवाडा मुक्ति संग्रामात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबिय उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, खऱ्या अर्थानं मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये ज्यांनी मोलाची भूमिका पार पाडली ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या स्मारकाच्या उद्घाटन कार्यक्रमांमध्ये या ठिकाणी आल्यानंतर मला मनापासून समाधान होत आहे. त्यांचे संपूर्ण जीवन ते व्रतस्त होते. स्वामी रामनंद तीर्थ हे खेडगीकर कुटुंबामध्ये जन्माला आले. यात त्यांचे एक शिक्षक म्हणून जीवन पाहायला मिळते, दीक्षा घेतल्यानंतर ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. स्वामी विवेकानंदाप्रमाणेच तरूणाईमध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी देशभक्ती जागृत केली. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला असला तरी मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळण्याकरीता १७ सप्टेंबर १९४८ म्हणजे जवळपास १३ महिन्याचा कालावधी लागला. १३ महिने मराठवाडा निजामाशी झुंजत होता.या कालावधीत मराठवाडा निजामाच्या इस्टेटचा भाग होता. ज्या १३ महिन्याच्या आधीच सुरू असलेल्या रजाकारांच्या संपूर्ण अन्यायाची पराकाष्टा झाली होती आणि त्याच्याविरुद्ध एक मोठा रणसंग्राम उभा झाला होता. यामध्ये इतर स्वातंत्र्यसैनिकांचे स्वामी रामानंद तीर्थ यांनी या लढ्यात नेतृत्व केले. या लढयाला एक प्रकारे संघर्षाच्या लढयामध्ये त्यांनी परिवर्तित केले. हैदराबाद असो की मराठवाडा असो या सगळीकडे त्यांनी जी काही स्वतंत्र अस्मितेची ज्योत पेटवली, त्यातून अनेक तरुण अनेक महिला या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये उतरल्या आणि त्यातून हैदराबादच्या निजामाच्या जोखडातून आपण मराठवाड्याला मुक्त करू शकलो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या मातब्बर गृहमंत्र्यांनी त्यांच्या या स्वतंत्र संग्राम सेनानींच्या हाकेला प्रतिसाद देत सैनिकी कारवाई केली आणि त्यातून मराठवाडा मुक्त झाला. तो दिवस म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ हा होता. तो आता दरवर्षी मराठवाडा मुक्ती दिन म्हणून आपण साजरा करतो आणि त्यावेळी प्रामुख्याने आपण स्वामी रामानंद तीर्थ यांचा पुण्यस्मरण करत आज त्यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

ऐतिहासिक कमल तलावाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. महानगरपालिकेने कमल तलावाच्या पुनर्जिवनाचे काम केल्याबद्दल महापालिका आयुक्त जी.श्रीकांत आणि त्यांच्या सर्व अधिकाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. छत्रपती संभाजीनगर शहरात येणाऱ्या पर्यटकांसाठी एक नवीन ठिकाण कमल तलाव म्हणून पाहण्यास उपलब्ध झाले असल्याचेही त्यांनी सांगितले. स्वामी रामनंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे शिल्पकार निरंजन मडिलगेकर यांचा यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कमल तलावाचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्वत: तिकीटाची खरेदी करून कमल तलाव नागरिकांसाठी खुला करण्यात आल्याचे जाहिर केले.

# लासुर स्टेशन शाळेतील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा १७ वर्षानंतर स्नेह मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर/प्रतिनिधी/फिरोज मन्सुरी/**



गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेत शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उपशिक्षणाधिकारी **परमेश्वर क्षिरसागर** यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

सन २००८ मधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी हा मेळावा आयोजित केला होता. यामध्ये सर्व माजी शिक्षकांचे स्वागत करण्यात आले:परमेश्वर क्षिरसागर, आनंदराव माघाडे, प्रशांत देसाई, अरविंद तुपे, मच्छिंद्र पाणकर, प्रशांत दाभाडे, बाळासाहेब भालेराव, मनीषा पाटील, ममता गुंजाळ, भालचंद्र साळुंखे, फिरोज शेख यांची उपस्थिती होती.

उपशिक्षणाधिकारी परमेश्वर क्षिरसागर यांनी बोलताना सांगितले की, सर्वांनी आपले शिक्षण अपूर्ण राहिले असल्यास ते पूर्ण करावे आणि नोकरीसह स्पर्धा परीक्षांची तयारी करावी. तसेच, मेळाव्याचा खर्च टाळून एखाद्या आजारी किंवा आर्थिक अडचणीत असलेल्या माजी विद्यार्थ्यांना मदत करणे सामाजिक कार्य ठरेल, असे त्यांनी आवाहन केले.शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत देसाई यांनी माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचे शासन आदेश सांगितले व सर्वांनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले.

इतिहास अभ्यासक व माजी शिक्षक आनंदराव माघाडे यांनी सत्य इतिहास जाणून घेण्यासाठी पुस्तके वाचण्याचा सल्ला दिला, तर मच्छिंद्र पानकर यांनी सुदृढ आरोग्यासाठी मैदानी खेळांमध्ये सहभाग घेण्याचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी प्रतिनिधी अमोल अंभोरे यांनी केले, तर सूत्रसंचालन सनी गायकवाड यांनी केले. माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी भरपूर परिश्रम घेतले:गणेश टाके, अतुल गुंजकर, प्रवीण माळदे, अमोल काकडे, अल्ताफ पटेल, श्रावण पाडसे, गोकुळ, जुगल बनकर, कल्पेश सोनी, स्वप्निल बागुल, रमेश जाधव, सचिन प्रसाद, मयुर गायकवाड, सागर टाके, रामकिसन हाडके, राहुल जाधव, सलमान, संदिप पोपट सोनवणे, नाना सोमनाथ पगारे, विशाल शेजवल, रवि वंजारे, शिवाजी जाधव, प्रमोद गायकवाड, विकी रणयेवले, आशिष सुरासे, नदीम भाऊ, अर्जुन क्षीरसागर, सचिन गुंजकर, मोशीन शेख, शाहरुख पठाण, विजय संघवी, लक्ष्मण पवार, अनिल पोळके, अर्शद शाहा, शाम देबवने, सचिन सोमवंशी, समीर शेख टेलर, रवी सोमवंशी, जीवन बागुल, विद्या पोळके, पूजा रणयेवले, ज्योती लहाने, छाया वाघमारे, योगिता साळवे, आरती भाले आदींच्या सहभागाने हा स्नेह मेळावा यशस्वी झाला.

# येणारा काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** आयुर्वेद या निसर्गाशी अनुरुप उपचार पद्धतीचे महत्त्व जगभरात मान्य झाले आहे. केंद्र शासनाने आयुष मंत्रालयाने या उपचार पद्धतीला शिक्षण, उपचारात वापर, संशोधन अशा विविध प्रकारे चालना दिली असून येणारा काळ हा आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.येथील सातार तांडा भागातील श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज ण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या नवीन वास्तूचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. राजाचे इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य खा. डॉ. भागवत कराड, श्रीयश प्रतिष्ठानचे बसवराज मंगरुळे,सचिव संगिता मंगरुळे, रुग्णालय अधीक्षक डॉ. परेश देशमुख, अधिष्ठाता स्वाती इटगे आदी मान्यवर उपस्थित होते.

**श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज ण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटर नूतन वास्तू उद्घाटन**

प्रारंभी महाविद्यालयाच्या नूतन वास्तूचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांना फडणवीस यांनी संबोधित केले. ते म्हणाले की, भारतीय जीवनपद्धतीस अनुकूल व निसर्गाशी साधर्म्य सांगणारी ही उपचार पद्धती वेदांमध्ये आयुर्वेद या नावाने सांगण्यात आली आहे. आजाराच्या लक्षणांवर नव्हे तर मुळाशी जाऊन आयुर्वेदात उपचार केले जातात. ही उपचार पद्धती शाश्वत उपचार पद्धती आहे. आयुर्वेद उपचार पद्धतीचा जगभरात वापर वाढत आहे. भारतात आयुर्वेद उपचार पद्धतीने उपचार घेण्यासाठी अनेक लोक पर्यटक म्हणून येत आहेत. आयुर्वेदाने या जगाला विज्ञान निष्ठ उपचार पद्धती देऊन शल्य चिकित्सा पद्धतीही दिली आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, कोविड काळामध्ये रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या पूरक औषधांमध्ये आयुर्वेदीक औषधींचा सर्वाधिक समावेश होता. केंद्र सरकारने या उपचार पद्धतीला चालना देण्याचे ठरविले असून त्यास अनेक प्रकारे चालना दिली जात आहे. त्याचाच एक भाग प्रशिक्षित वैद्य तयार करणे हे असून त्यासाठी आयुर्वेद महाविद्यालयांना चालना दिली जात आहे. आगामी दशकात भारत हा जगातली प्रमुख अर्थव्यवस्था बनून तिसऱ्या क्रमांकावर झेप घेऊ पहात आहे. २०४७ पर्यंत आपला देश आर्थिक महासत्ता झालेला असेल.

आपला देश हा जगातील सर्वाधिक तरुणांचा देश आहे. मराठवाड्यातही आपण उद्योगाला चालना देऊन इलेक्ट्रिक व्हेईकलचे कॅपिटल म्हणून छत्रपती संभाजीनगरची ओळख निर्माण होत आहे, असेही त्यांनी सांगितले.या सोहळ्यास शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# कन्नडमध्ये भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी पक्षास मोठे खिंडार,अनेक पदाधिकाऱ्यांचा काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड/प्रतिनिधी**/कन्नड शहरातील राजकीय वातावरणात मोठे घडामोडी घडत आहेत. भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या पक्षांच्या काही प्रमुख पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश करून तिन्ही पक्षांना धक्का दिला आहे. ही घटना शहरातील नगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीच्या काळात घडल्याने राजकीय रंगभूमी आणखी तगडी बनली आहे.

दि. १५ रोजी काँग्रेस पक्षाच्या शहर कार्यालयात हा जाहीर प्रवेश संपन्न झाला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन काँग्रेसचे प्रदेश चिटणीस आणि माजी आमदार नामदेवराव पवार तसेच नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी काँग्रेसचे उमेदवार अब्दुल जावेद यांनी केले. या कार्यक्रमात शिवसेनेचे माजी उपनगराध्यक्ष आणि आजी शहराध्यक्ष डॉ. सादाशिव पाटील, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक सेलचे माजी जिल्हाध्यक्ष व माजी नगरसेवक अहमद अली भैय्या, भाजपाचे अनु: सुती जाती ज.सेलचे माजी उपाध्यक्ष संदीप उजागरे, शिवसेनेचे उपशहर प्रमुख प्रकाश काचोळे, भाजपाचे संजय वंजारे, माजी नगरसेवक सुरेश आनावडे, सोमनाथ दाभाडे, विनोद गजलेश्वर, बापू बिरारे, अब्दुल आजीज यासह अनेक प्रमुख पदाधिकारी सहभागी झाले.

या जाहीर प्रवेशामुळे तिन्ही पक्षांना मोठा धक्का बसला असून, शहरातील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

काँग्रेस पक्षाच्या नगरस्तरीय ताकदीत लक्षणीय वाढ झाली असून, पक्षाच्या गटबांधणीस मोठा फायदा झाला आहे. यावेळी सचिन पवार, याकूब शेख यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रमाची भव्यता आणि पक्षाची एकजूट स्पष्टपणे दिसून आली.

शहरातील निवडणूक रणधुमाळीच्या पार्श्वभूमीवर हा जाहीर प्रवेश काँग्रेससाठी मोठा राजकीय विजय मानला जातो, तर भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेससाठी ही गंभीर परिस्थिती निर्माण करणारा टप्पा ठरला आहे.

यामुळे शहरातील मतदारांमध्ये राजकीय जागरूकता वाढेल आणि आगामी निवडणुकीत पक्षांमधील स्पर्धा आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.



# सार्थक माकोडेची महाराष्ट्रात शतकी भरारी

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव/ प्रतिनिधी/** सोयगाव तालुका आणि संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. महाविद्यालयाच्या बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थी सार्थक कैलास माकोडे यांनी महाराष्ट्र राज्यस्तरीय १०० मीटर धाव स्पर्धेत तृतीय क्रमांक (काँस्य पदक) मिळवून महाविद्यालयाचे आणि परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे.

राज्यभरातील शेकडो प्रतिभावान धावपटूंशी स्पर्धा करताना सार्थकला कठीण शर्यतीला सामोरे जावे लागले. त्याच्या वेगवान धावा आणि जिद्दीच्या जोरावर अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी करत तिसरे स्थान मिळाले. ही कामगिरी फक्त सोयगावसाठी नव्हे, तर मराठवाड्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

सार्थकच्या या यशामागे त्याचे कठोर परिश्रम, महाविद्यालयाचे प्राचार्य, जिमखाना विभाग, क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन महत्वाचे ठरले.महाविद्यालय प्रशासनाने यशाबद्दल सार्थकचे अभिनंदन केले असून, भविष्यात तो राष्ट्रीय स्तरावरही चमकदार कामगिरी करेलअसा विश्वास व्यक्त केला आहे.

# समाजसेवक संतोष शिंदे भारत भूषण पुरस्काराने सन्मानित

आत्ताच एक्सप्रेस
कन्नड/ प्रतिनिधी / कन्नड तालुक्यातील मोहरा येथील कै. पुंडलिकराव पाटील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक व समाजसेवक संतोष दगडू शिंदे यांचा सामाजिक कार्यक्षेत्रातील अपार योगदान लक्षात घेऊन राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

संतोष शिंदे हे फक्त शाळेतील कार्यापुरते मर्यादित न राहता, शाळेबाहेरही समाजसेवा आणि निसर्ग संवर्धनासाठी तत्पर राहतात. त्यांनी वृक्षारोपण, निसर्ग संवर्धनाच्या उपक्रमांचे आयोजन केले असून विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या महत्त्वाची जाणीव करून देण्याचे कार्यही ते सातत्याने करतात.

त्याशिवाय, शिंदे यांनी सैनिकांसाठी विविध कार्यक्रम राबवले आहेत, ज्यात त्यांच्या कर्तृत्वाचा, देशभक्तीचा आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श दिसून येतो. त्यांनी गावातील वाचनालयाच्या सुविधांचा विस्तार करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी कार्य केले आहे. तसेच, गरजवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आणि आर्थिक सहाय्य पुरविणे ही त्यांच्या सामाजिक कार्याची एक महत्त्वाची बाजू आहे. शाळेत विविध उपक्रम राबवून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, नैतिक मूल्ये आणि समाजसेवेची जाणीव निर्माण करण्याचे कार्य केले आहे.

हा गौरव महाराष्ट्रातील भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे आणि सौ ज्योती सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समारंभात दिला गेला. पुरस्कार वितरण कार्यक्रम रविवार, दिनांक १६/११/२०२५ रोजी पार पडला, जिथे महाराष्ट्रातील नामांकित अभिनेत्री, समाजसेवक आणि साहित्यिक यांच्या हस्ते हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला.



संतोष शिंदे यांच्या या पुरस्काराने केवळ मोहरा व कन्नड तालुकाच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याला अभिमान वाटत आहे. त्यांच्या निस्वार्थ कार्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, स्थानिक समाज आणि तालुका प्रशासन यांच्याकडून त्यांचे सतत कौतुक होत आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सामाजिक समन्वय, पर्यावरणप्रती जाणीव आणि सेवा भावनेची नवीन प्रेरणा निर्माण झाली आहे, ज्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी ते एक आदर्श ठरले आहेत.

# संस्थाचालकासह दोन मुख्याध्यापकांवर गुन्हा दाखल

## छत्रपती संभाजीनगर मधील हडकोतील शाळेने पळविले फुलंब्रीतील ६० विद्यार्थी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर मधील हडको येथील जयलक्ष्मी पी.एस. विद्यालयाने फुलंब्रीतील न्यू ओऑसिस इंग्रजी शाळेचे तब्बल ६० विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने पळविल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. हा प्रकार २८ सप्टेंबर रोजी घडल्याचे समजते. या प्रकरणामुळे शैक्षणिक संस्थांमधील ऑनलाइन व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेतील सुरक्षेचा प्रश्न उभा राहिला आहे.

फुलंब्रीतील न्यू ओऑसिस इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका करुणा दांडगे यांच्या फिर्यादीनुसार, जयलक्ष्मी पी.एस. विद्यालयाने शाळेचा यूजर आयडी व पासवर्ड मिळवून ६० विद्यार्थी आपल्या शाळेच्या ऑनलाइन व्यवस्थेत वळवले. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांची नावे फसवणुकीच्या पद्धतीने प्रवेश दिल्याचे आढळले आहे. न्यू ओऑसिस शाळेच्या प्रशासनाला ऑनलाइन प्रणालीतून हे विद्यार्थी दुसऱ्या शाळेत जाण्याची माहिती झाल्यानंतर त्यांनी तातडीने फुलंब्री पोलिसांत तक्रार नोंदवली.

या प्रकाराची पार्श्वभूमी अशीही सांगितली जाते की, जयलक्ष्मी पी.एस. विद्यालयाने विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार मिळणारे अनुदान वाढवण्यासाठी आणि नवीन तुकडी व शिक्षकांच्या पदांची मंजुरी मिळवण्यासाठी हा उपद्व्याप केल्याची शक्यता आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ फसवणुकीपुरताच मर्यादित नसून, शैक्षणिक व्यवस्थापनातील भ्रष्टाचाराच्या गंभीर संकेतांकडेही लक्ष वेधतो.

फुलंब्री पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदविला असून, जयलक्ष्मी पी.एस. विद्यालयाचे संस्थापक गणेश काळे, मुख्याध्यापक सूर्यवंशी व उपाध्यापक यांच्यावर संगनमताने विद्यार्थ्यांची नावे वळवून फसवणूक केल्याचा आरोप आहे. पोलिस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

त्यात मुख्यत्वे या गोष्टींचा अभ्यास केला जात आहे: शाळेचा यूजर आयडी व पासवर्ड कसा मिळाला, विद्यार्थ्यांना का ट्रान्स्फर केले गेले, तसेच अन्य कोणतेही संबंधित प्रशासनिक किंवा तांत्रिक फसवणुकीचे घटक आहेत का.

हा प्रकार केवळ शाळांमध्येच नव्हे, तर ऑनलाइन शैक्षणिक व्यवस्थेच्या सुरक्षिततेवरही प्रश्न उपस्थित करतो. त्यामुळे भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शाळांमध्ये डिजिटल सुरक्षा, विद्यार्थी नोंदणीचे कठोर नियमन आणि प्रशासनिक पारदर्शकता सुनिश्चित करण्याची आवश्यकता असल्याचे या घटनेतून दिसून येते.

# जालना महापालिकेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसची तयारी जोरात

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा गट) महापालिका निवडणुकीत मजबूत उपस्थिती दाखवणार आहे. पक्षाचे जिल्हा अध्यक्ष माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी सांगितले की, आमच्या शिवाय महापौर कोणत्याही पक्षाचा होऊ शकणार नाही.

रविवार रोजी इच्छुक उमेदवारांना पक्षाचे उमेदवारी अर्ज वितरण करण्यासाठी जिल्हा पक्ष कार्यालय येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली होती. चव्हाण म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने समाजातील सर्व घटकांचा सहभाग साधून धर्मनिरपेक्ष विचारांनी शहरात पक्षाची संघटना मजबूत केली आहे. आगामी निवडणुकीत सर्व समाज घटकांना योग्य संधी देऊन पक्षाची उमेदवारी दिली जाईल.

शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शेख मेहमूद यांनी सांगितले की, अल्प काळात त्यांनी पक्ष बांधणीला सुरवात केली असून, लवकरच शहर जिल्हा कार्यकारिणी, बूथ कमिटी आणि प्रभाग समित्या स्थापन केल्या जातील. काँग्रेसमधून आलेल्या अनेक पदाधिकारी व



कार्यकर्त्यांना पक्षात योग्य सन्मान दिला जाईल.

यावेळी राष्ट्रवादी प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस धैर्यशील चव्हाण, महिला प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या शकुंतलाताई कदम, जिल्हा अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष शहाआलम खान, प्रदेश पदाधिकारी भाऊसाहेब गोरे यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिर्झा अन्वर बेग यांनी केले, तर आभार शीतलताई बरोटे यांनी मानले.

# परतूर नगरपालिका निवडणूक : वंचित बहुजन आघाडी व शिवसेना (उबाठा) युतीची घोषणा



**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर /प्रतिनिधी** / परतूर तालुक्यातील स्थानिक राजकारणाला नवी दिशा देणारी महत्त्वपूर्ण घडामोड आज घडली आहे. वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी अधिकृतपणे परतूर नगरपालिका निवडणुकीत संयुक्त आघाडी जाहीर केली. अनेक दिवसांपासून अपेक्षित असलेली ही आघाडी औपचारिकरीत्या जाहीर होताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

**कार्यकर्त्यांमध्ये उत्साह**

आघाडीची घोषणा आणि उमेदवार जाहीर होताच दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडीचे झेंडे फडकावत घोषणा देत कार्यकर्त्यांनी परतूर शहरात आपली ताकद दाखवली.ही आघाडी आगामी परतूर नगरपालिका निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### नगराध्यक्षपदासाठी माधवी ताई पवारांची उमेदवारी जाहीर

या एकत्रित आघाडीने परतूर नगरपालिका निवडणुकीतील नगराध्यक्ष पदासाठी सौ. माधवी ताई पवार यांची उमेदवारी जाहीर केली.

सामाजिक भान, संघटन कौशल्य आणि स्थानिक विकास विषयांवरील त्यांचे सातत्यपूर्ण कार्य यांची दखल घेत ही निवड केल्याचे आघाडीच्या नेत्यांनी सांगितले.

माधवी ताई पवार या दोन्ही पक्षांच्या महिला नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करत असून त्यांची उमेदवारी जाहीर होताच महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले.

कार्यक्रमातील प्रमुख उपस्थिती आघाडी जाहीरनाम्याच्या बैठकीत दोन्ही पक्षांचे जिल्हा आणि तालुका पातळीवरील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये रामप्रसाद थोरात, जिल्हाध्यक्ष (जालना पूर्व), वंचित बहुजन आघाडी,महेश भैया नळगे,जिल्हाप्रमुख, शिवसेना (उबा ठाकरे),माधव मामा कदम, ज्येष्ठ शिवसेना नेते, रवी भदर्गे तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी,राहुल नाटकर, गौतम खंडागले, जमीर शेख, दिपक हिवाळे तसेच दोन्ही पक्षांचे अन्य पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### आघाडीचे उद्दिष्ट

दोन्ही पक्षांनी परतूर नगरपालिकेचा विकास, स्वच्छ प्रशासन आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले.नगरपालिकेतील पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, आरोग्य सुविधा, बाजारपेठ व्यवस्थापन आणि स्वच्छता यावर विशेष भर दिला जाणार आहे. संयुक्त आघाडीमुळे परतूरमध्ये सक्षम, स्थिर आणि विकासाभिमुख सत्ता स्थापित करता येईल, असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला.

# आदिवासी जननायक बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव /प्रतिनिधी**/ आदिवासी जननायक, क्रांतीसुर्य आणि जमीन, जल, जंगल हक्कांसाठी लढलेल्या महायोद्धा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विजा प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, घानेगाव तांडा येथे उत्साहात कार्यक्रम साजरा करण्यात आला.

मुख्याध्यापक संजय पाटील (माध्यमिक) व प्रवीण पवार (प्राथमिक) यांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थिनी वर्षा नारायण राठोड, नंदिनी जगन चव्हाण, सोनाली संतोष राठोड व लक्ष्मी मनोज राठोड यांनी आदिवासी बंजारा समाजाचा पारंपरिक पेहराव सादर केला.

प्रवीण पवार यांनी मनोगत व्यक्त केले, ज्येष्ठ शिक्षक सुनील



कवीश्वर व देवचंद बागुल यांनी मार्गदर्शन केले, तर सलीम तडवी यांनी आभार प्रदर्शन केले.गावातील जेष्ठ नागरिक जगन उत्तम चव्हाण, सुमनबाई बाबुराव चव्हाण, सुमनबाई गणेश राठोड, ध्रुपदाबाई गणेश राठोड व शांतीबाई मांगो चव्हाण उपस्थित होते.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# सिटूचे नववे जिल्हा अधिवेशन जालना येथे भव्यरित्या संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी** /सेंट्रल इंडियन ट्रेड युनियन्स (सिटू) जालना जिल्हा कमिटीचे नववे जिल्हा अधिवेशन नूतन विद्यालय, जालना येथे आज यशस्वीरित्या पार पडले. अधिवेशनाची सुरुवात जिल्हाध्यक्ष मधुकर मोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सिटूचे राज्याध्यक्ष डॉ. डी. एल. कराड उपस्थित होते, ज्यांनी अधिवेशनाचे उद्घाटन करताना उपस्थितांना मार्गदर्शन केले. उद्घाटन सोहळ्यात वरिष्ठ कामगार नेते कॉम्रेड अण्णा सावंत यांनी देखील मार्गदर्शन केले. मंचावर सरिता शर्मा, अनिल मिसाळ, कांचन वाहुळे, हरिश्चंद्र लोखंडे आणि संजय खंडागळे यांची उपस्थिती होती.

अधिवेशनात मार्गदर्शन करताना डॉ. डी. एल. कराड यांनी सांगितले की, कामगारांनी आपले हक्क समजून घेऊन संघटना मजबूत करणे अत्यावश्यक आहे. त्यांनी म्हटले की, केवळ संघटित होऊनच कामगारांना न्याय मिळवता येईल. त्यांनी भाजप सरकारच्या काळात बेरोजगारी वाढल्याचे, लाखो नोकऱ्या कमी झाल्याचे आणि कंत्राटी नोकऱ्यांचा विस्तार झाल्याचे नमूद केले. कंत्राटी कामगारांमधून फक्त कामगाराची पिळवणूक होत असून, त्यांच्या श्रमाला न्याय मिळत नाही. त्यामुळे सगळ्या कामगारांनी एकजूट होऊन सत्ताधारी आणि भांडवलशाहीविरुद्ध तीव्र संघर्ष करावा लागेल.

डॉ. कराड यांनी अधिवेशनात उपस्थितांना आवाहन केले की, येत्या काळात कंत्राटी कामगार, योजना कर्मचारी व सर्व श्रमिक वर्ग एकत्र येऊन आपले हक्क मिळवण्यासाठी संघटित संघर्ष करावा लागेल. तसेच त्यांनी कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि कामगार विरोधी धोरणांना विरोध करण्यासाठी सजग राहण्याचे सांगितले.

संघटनेचे सेक्रेटरी अनिल मिसाळ यांनी मागील तीन वर्षांचा अहवाल वाचून दाखवला. अहवालावर सिटूच्या सलग्न युनियनच्या प्रतिनिधींनी चर्चा केली, आणि त्यांना सविस्तर उत्तरे देऊन सेक्रेटरीने सर्व शंका निरसन केल्या.

अधिवेशनात खालील महत्वाचे ठराव संमत करण्यात आले:

१. योजना कर्मचाऱ्यांना सरकारी सेवेत कायम करणे.

२. लोकशाही विरोधी, शेतकरी विरोधी, कामगार विरोधी, जन विरोधी आणि महाराष्ट्र जनसुरक्षा अधिनियम रद्द करणे.

३. कामगार विरोधी कार्पोरेट दर्जा, चार संहिता आणि बार तासाचा कामाचा दिवस रद्द करणे.

४. कामगारांना त्रास देणारी कंत्राटी पद्धत बंद करणे.

५. महिलांवरील वाढते अत्याचार थांबवणे व डॉक्टर संपदा मुंडे यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा करणे.

पुढील तीन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष म्हणून मधुकर मोकळे तर जनरल सेक्रेटरी म्हणून अनिल मिसाळ यांची निवड झाली. उपाध्यक्ष कॉम्रेड अण्णा सावंत, सहसेक्रेटरी डॉ. सुनंदा तिडके व हरिश्चंद्र लोखंडे, कोषाध्यक्ष



कांचन वाहुळे, सरिता शर्मा, तर सदस्य म्हणून संतोष पाटोळे, संजय खंडागळे, बाबासाहेब पाटोळे, लता विर, लक्ष्मण मोहिते, सुनिता म्हस्के, मीरा बोराडे, बंडू कणसे, कल्पना मिसाळ, सुजाता छडीदार, उषा बनकर, जनार्दन मुळे यांची निवड करण्यात आली.

अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी सिटूच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेतले. या अधिवेशनातून कामगार संघटनांचा संघटनात्मक बळ वाढविणे, कामगारांच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याची तयारी आणि सामाजिक न्यायाची भूमिका अधिक दृढ करण्याचा संदेश दिला गेला.

# शिवरायांचे गडकिल्ले गणिताचा अभ्यास करण्यासाठी आदश-प्रा.श्रीकांत चिंचखेडकर

### जिल्हा परिषद शाळेत बाल दिनानिमित्त गणित कार्यशाळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/भारताला प्राचीन काळापासूनच विज्ञान व गणिताचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. आपल्या वास्तू, शिवाजी महाराजांची गडकिल्ले, राजवाडे, भव्य मंदिरे यांमध्येही गणिताचे सूक्ष्म प्रयोग दिसतात, असे प्रतिपादन प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी केले.बाल दिनानिमित्त रेल्वे स्टेशन रोडवरील जिल्हा परिषद शाळेत आयोजित गणित कार्यशाळेत प्रा. चिंचखेडकर यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी आणि शैक्षणिक वाटचालीसाठी प्रयोगांद्वारे गणिताचे संवाद साधले. उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे आणि मुख्याध्यापिका सौ. मेहेत्रे या व्यासपीठावर उपस्थित होत्या.




प्रा. चिंचखेडकर म्हणाले की,पुरातन गणितीय अभ्यासाची विसर पडल्यामुळे गणिताबद्दल विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड तयार झाला आहे. तो दूर करण्यासाठी त्यांनी मुलांसमोर गमतीशीर उदाहरणे, वर्किंग मॉडेल्स आणि प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल आणि जिज्ञासा निर्माण झाली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन गणिताबद्दलची भीती दूर केली.कार्यक्रमादरम्यान प्रा. चिंचखेडकर यांनी सर्व वर्गांसमोर गणिताची प्रात्यक्षिके दाखवली आणि यशस्वी महापुरुषांचे चरित्र सांगून प्रेरणा दिली. शाळेच्या उपक्रमांचेही कौतुक केले गेले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. गव्हाणे यांनी केले.

# युनायटेड क्रिकेट असोसिएशनची कार्यकारीणी स्थापन करण्यासाठी बैठकीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/आंतरराष्ट्रीय युनायटेड क्रिकेट फेडरेशन आणि राष्ट्रीय युनायटेड क्रिकेट असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य युनायटेड क्रिकेट असोसिएशनच्या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा युनायटेड क्रिकेट असोसिएशन स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याचाच भाग म्हणून, जालना जिल्ह्यातही जालना जिल्हा युनायटेड क्रिकेट असोसिएशनची स्थापना करण्यात येणार आहे. या संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील क्रिकेट विकासाला गती मिळेल, तर तरुण क्रिकेटपटूंना प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध होतील.

यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले असून ही बैठक शनिवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता कृष्णा आर्केड, प्रयाग हॉस्पिटलजवळ, रेल्वे स्टेशन ते चमन रोड, जुना जालना येथे होणार आहे. बैठकीत उपस्थितांना संघटनेच्या उद्दिष्टांची माहिती देण्यात येईल, कार्यकारिणीची निवड आणि आगामी कार्यक्रमांची रूपरेषा स्पष्ट केली जाईल.

तसेच जिल्ह्यातील क्रिकेट प्रेमी, प्रशिक्षक आणि माजी क्रिकेटपटूंना सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळणार आहे.

अधिक माहितीसाठी किंवा सहभाग नोंदणीसाठी कार्यालयाशी मो. क्र. ८६६८९९२५८६ वर संपर्क साधता येईल. याशिवाय, शेख अहमेद, ॲड. अमजत पठाण, नागसेन बनकर, शेख चाँद पी.जे., संतोष वाघ, नितीन जाधव, श्रीमती शेख महेजबीन आणि श्रीमती गीता संगम यांच्याशी देखील संपर्क साधता येईल.जालना जिल्ह्याच्या सर्व आजी-माजी क्रिकेटपटू, प्रशिक्षक, तसेच क्रिकेट प्रेमींना या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे जालना जिल्ह्यातील क्रिकेटसंबंधित उपक्रम अधिक सुव्यवस्थित आणि संघटित होण्यास मदत होईल, तर युवक व तरुण क्रिकेटपटूंना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी देखील मिळेल.

# आता आणखी एका देशाची पान १ वरून

पान १ वरून

निदर्शने शांत करण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला. १०० पोलिस अधिकारी जखमी राजधानीचे सुरक्षा सचिव पाब्लो वाझक्केझ यांनी द इंडिपेंडेंटला सांगितले की निदर्शनांमध्ये १२० लोक जखमी झाले, त्यापैकी १०० पोलिस अधिकारी होते. २० जणांना अटक करण्यात आली.

या वर्षी, अनेक देशांमधील ऋक्षपन तरुण असमानता, लोकशाहीचा ऱ्हास आणि भ्रष्टाचाराचा निषेध करण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. सप्टेंबरमध्ये, सोशल मीडियावरील बंदीनंतर नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली, ज्यामुळे पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागला. मेक्सिकोमध्ये, तरुण लोक भ्रष्टाचार आणि हिंसक गुन्ह्यांसाठी दंडमुक्तीमुळे नाराज आहेत. आम्हाला अधिक सुरक्षा हवी आहे, असे २९ वर्षीय व्यवसाय सल्लागार आंद्रेस मस्सा म्हणाले. निदर्शनांमध्ये केवळ तरुणच नव्हे तर मध्यमवयीन आणि वृद्ध लोक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. ४३ वर्षीय डॉक्टर अरिसबेथ गार्सिया म्हणाल्या, आम्हाला सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी अधिक निधी हवा आहे. परंतु सर्वात मोठी समस्या म्हणजे सुरक्षितता. डॉक्टरही असुरक्षित आहेत. येथे कोणीतरी मारले जाते आणि काहीही घडत नाही. राष्ट्रपती शीनबॉम यांनी आरोप केला आहे की विरोधक निदर्शनांना खतपाणी घालत आहेत. मेक्सिकोमध्ये अलिकडच्या हाय-प्रोफाइल हत्याकांडांमुळे राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शीनबॉम यांच्याविरुद्ध जनतेचा रोष वाढला आहे. निदर्शनांच्या काही दिवस आधी, शीनबॉम यांनी उजव्या विचारसरणीच्या विरोधी पक्षांवर गंभीर आरोप केले.

# ओजस औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी**/ धरती जनसेवा प्रतिष्ठान शैक्षणिक संकुलातील ओजस कॉलेज ऑफ फार्मसी, जालना येथे राष्ट्रीय बालदिवस निमित्त भव्य रक्तदान शिबिर यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले.

या शिबिराला विद्यार्थ्यांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळाला.शिबिरात एकूण ५० रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारी, करुणा आणि मानवसेवेची वचनबद्धता दर्शवली. स्थानिक रक्तपेढीच्या सहकार्याने शिबिरात वैद्यकीय देखरेख, सुरक्षा प्रोटोकॉल आणि सुचारु समन्वय सुनिश्चित करण्यात आले.

ओजस कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विठ्ठल कुचके यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाचे कौतुक केले आणि तरुणांमध्ये सामाजिक जागरूकता आणि सहानुभूती निर्माण करण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीत प्राध्यापक आणि स्वयंसेवकांचेही महत्त्वपूर्ण योगदान राहिले.




कार्यक्रमास संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री भागवत शिंदे, प्रा. पुरुषोत्तम राखुंडे, प्रा. प्रमोद भोसले, प्रा. सादत खान, प्रा. शशिकांत वडले, प्रा. प्रवीण राठोड, प्रा. सय्यद शाहरुख आणि महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयाने सर्व रक्तदात्यांचे आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813